MHRG040028062025

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १२०५/२०२५</u>**
श्रीमती. प्रियंका विजय वेल्ये व इतर वि. निरंक
**<u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>**

१. सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन १८२७ अंतर्गत वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे मयत विजय बाळकृष्ण वेल्ये हे दिनांक २१.१०.२०२३ रोजी बेलापुर येथे मृत्युपत्र न करता मरण पावले आहेत. अर्जदार क्रं. १ ही मयत विजय बाळकृष्ण वेल्ये यांची पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ हे मुले व अर्जदार क्र. ४ ही आई आहे. अर्जदार हे मयत विजय बाळकृष्ण वेल्ये यांचे वारस आहेत. अर्जदार यांनी वारसदाखला मिळण्याकामी या न्यायालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल केलेला नाही. करीता सदर अर्ज वारसप्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

३. अर्जदार क्र १ यांनी नि.क्र. ११ वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. तसेच कागदपत्र म्हणुन मयत विजय बाळकृष्ण वेल्ये यांचा मृत्यूदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१२, अर्जदार यांचे आधारकार्डच्या प्रमाणित प्रती नि.क्र. १३ ते १६, दिनांक ०५.०६.२०२५ रोजीचे कुलअखत्यारपत्राची मुळ प्रत नि.क्र. १७, दिनांक १७.०७.२०१० रोजीचे करारनाम्याची प्रमाणित प्रत नि.क्र. १८, पुरावा बंद पुरशीस नि.क्र. २० इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

४. अर्जासंदर्भात नि.क्र. ०७ प्रमाणे जाहीरनामा व नि.क्र. १९ वरील 'दैनिक किल्ले रायगड' वर्तमानपत्रातील दिनांक १४.१०.२०२५ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. मात्र कोणत्याही ति—हाईत इसमाची याकामी हरकत प्राप्त झाली नाही.

५.        दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता मयत विजय बाळकृष्ण वेल्ये हे दिनांक २१.१०.२०२३ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयत विजय बाळकृष्ण वेल्ये यांची पत्नी आहे, अर्जदार क्र. २ व ३ हे मयत विजय बाळकृष्ण वेल्ये यांचे मुले आहेत व अर्जदार क्र. ४ ही मयत विजय बाळकृष्ण वेल्ये यांची आई आहे. करिता अर्जदार हे मयत विजय बाळकृष्ण वेल्ये यांचे कायदेशीर वारस आहे. नि.क्र. ०७ वरील जाहीरनामा व नि.क्र. १९ वरील जाहीर नोटीस प्रसिध्द होउन देखील इतर कोणत्याही ति—हाईत इसमांनी याकामी हजर राहुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१.   अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२.   अर्जदार हे मयत विजय बाळकृष्ण वेल्ये यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला आवश्यक त्या मुद्रांकशुल्क यावर देणेत यावा.

RAJSHRI MANOHAR GANVIR
Digitally signed by RAJSHRI MANOHAR GANVIR
Date: 2026.06.29 17:56:00 +0530

पनवेल                                        (राजश्री म. गणवीर)

**दि. २९.०६.२०२६**                    **४थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल**